स्वातंत्र्य समता बंधुता न्याय

५०

• गर्व से कहो हम बंधु है । •

राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, बंधुता प्रतिष्ठान, काषाय प्रकाशन पुणे,
रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध,
भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रितम प्रकाश महाविद्यालय भोसरी आणि
भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे
या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने

# ऐतिहासिक पहिले विश्वबंधुता साहित्य संमेलन

शुक्रवार, दि. १२ एप्रिल २०२४ स्थळ - एस.एम. जोशी सभागृह, नवी पेठ, पुणे - ३०.


मा. शांतीलाल मुथ्था

संस्थापक अध्यक्ष

बंधुताचार्य प्रकाश रोकडे

भारतीय जैन संघटनेच्या वाघोली येथील
कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयास

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कार

## मानपत्र

पुरोगामी महाराष्ट्राला संत, महात्मे, महापुरुष आणि थोर समाजसुधारक यांची महान अशी परंपरा आहे. या उदात्त परंपरेचा अंगिकार करून आजही काही निवडक समाजसुधारक प्रज्ञावंत सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपले योगदान सिद्ध करीत आहेत. याचा आपणा सर्वांनाच सार्थ असा अभिमान आहे. त्यामध्ये समाजनिष्ठ उद्योजक, समाज सुधारक आणि सामूहिक विवाहाचे प्रणेते मा. शांतीलालजी मुथ्था यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

सन १९९३ साली महाराष्ट्रामध्ये झालेल्या महाकाय भूकंपामुळे प्रचंड जीवितहानी झाली. त्यामध्ये अनाथपण आलेल्या १२०० विद्यार्थ्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्विकारून आईच्या ममतेने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने अत्यंत कौशल्याने पार पाडली. पुढे त्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थेची निर्मिती केली. त्यातूनच वाघोली येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साकारले गेले. आजमितीस या महाविद्यालयामध्ये शेकडो शिक्षक विद्यादानाचे पवित्र कार्य करीत असून २२७२ विद्यार्थी अध्यापन करीत आहेत. त्यामध्ये महिला आणि मुलींचे प्रमाण अधिक आहे ही उल्लेखनीय अशी ही बाब आहे. ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ञ मा. सुरेशबापू साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. संजय गायकवाड हे मोठ्या कौशल्याने महाविद्यालयाची धुरा सांभाळत आहेत.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य संशोधन केंद्र, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नौदल युनिट आणि रेडक्रॉस युनिट हे विभाग अत्यंत उत्तमपणे कार्यरत आहेत. मध्यंतरी उद्भवलेल्या कोरोनाच्या भीषण परिस्थितीमध्ये उत्तम कामगिरी बजावली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १००% नोकऱ्या देण्यामध्ये महाविद्यालय यशस्वी ठरले आहे. नैसर्गिक आपत्तीत अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना मदत, कौशल्य विकास कार्यक्रम, कॅक्टस गार्डन, युवती आणि महिलांचे सक्षमीकरण, केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन, पालकांकरिता रोजगार योजना, साहित्य संमेलनाचे आयोजन हे अभिनव उपक्रम राबविण्यामध्ये महाविद्यालय आघाडीवर आहे. क्रीडा क्षेत्रातही या महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. दिल्ली येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत वैष्णवी सातव हीला सुवर्णपदक मिळाले. कबड्डीमध्ये या महाविद्यालयाची विद्यार्थीनी नेतृत्व करीत असून, खेलो इंडिया स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये अभिजीत दिसले याला सुवर्णपदक आणि तेजवीर कौर साहोटा या विद्यार्थिनीला कास्यपदक प्राप्त झाले आहे.

या आपल्या उत्तुंग कामगिरीचा गौरव म्हणून बंधुता लोकचळवळीच्या वतीने आपणांस डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कार प्रदान करीत आहोत. या मानपत्राच्या माध्यमातून आमच्या भावना शब्दांकित करीत आहोत.

हार्दिक अभिनंदन आणि मन:पूर्वक शुभेच्छा.

संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस | स्वागताध्यक्ष प्रा. कृष्णकुमार गोयल | संस्थापक, अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे

॥ आता निर्धार विश्वबंधुत्वाचा ॥